# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, पालघर

क्र.मह./आस्था/कक्ष-१/टे-२/एसआर-नं.५४/२०२१ दिनांक -२९/०६/२०२१

**विषय :- दि.०१/०१/२०२० रोजी कार्यरत असलेल्या तलाठी संवर्गातील कर्मचाऱ्यांची अंतिम ज्येष्ठता यादी प्रसिध्द करणेबाबत.**

**ज्ञापन :-**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, दिनांक २१/१०/२०११ मधील तरतुदीनुसार पालघर जिल्हाधिकारी अधिनस्त उपविभागीय अधिकारी आस्थापनेवरील स्थानापन्न तलाठी संवर्गातील कर्मचाऱ्यांची दिनांक ०१/०१/२०२०, रोजीची ज्येष्ठता दर्शविणारी अंतरिम (तात्पुरती) ज्येष्ठता यादी या कार्यालयाकडील ज्ञापन क्र.मह/आस्था/कक्ष-१/टे-२/तलाठी ज्येष्ठता /एसआर.नं.१५७/२०२१, दि.१२/०१/२०२१ अन्वये प्रसिध्द करणेत आली होती. सदर यादी प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांचे आत आक्षेप/सुचना दाखल करण्यात येवून सदर आक्षेप/ सुचना कार्यालय प्रमुखांच्या अभिप्रायासह सादर करण्यात याव्यात, असे नमुद करण्यात आलेले होते.

सदर अंतरिम ज्येष्ठता यादीबाबत सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व शाखा तसेच या कार्यालयाचे स्तरावर प्राप्त झालेल्या हरकती/आक्षेप यावर केलेली कार्यवाही व निर्णय सोबतच्या प्रपत्र - "अ" मध्ये दर्शविले आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियम १९८२ मधील तरतुदीनुसार एकूण ११९ कर्मचाऱ्यांची दिनांक ०१/०१/२०२० रोजीची तलाठी संवर्गाची अंतिम ज्येष्ठता यादी प्रसिध्द करण्यात येत आहे.

सर्व कार्यालय/ शाखा प्रमुख यांनी सदरची अंतीम ज्येष्ठता यादी त्यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डवर प्रसिध्द करुन, त्यांचे अधिपत्याखालील कार्यरत असलेल्या सर्व संबंधीत तलाठी संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणावी. सदरची ज्येष्ठता यादी प्रसिध्द केलेबाबतचा अहवाल या कार्यालयात दि.१४/०७/२०२१ पर्यंत सादर करावा.

(स्वाक्षरी)
(डॉ माणिक गुरसळ)
जिल्हाधिकारी पालघर

**प्रत :-**

१. मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांचे माहितीसाठी सविनय सादर.
२. अपर जिल्हाधिकारी पालघर, मुख्यालय जव्हार, यांना माहितीसाठी रवाना.
३. उप विभागीय अधिकारी डहाणू/पालघर/वसई/जव्हार/वाडा
४ तहसिलदार (सर्व)
५. जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी, पालघर.

२/- सदर जेष्ठता यादी या कार्यालयाचे संकेत स्थळावर (www.collectorpalghar.nic.in) प्रसिध्द करावी. सदर यादी संकेतस्थळावर ३० दिवस ठेवण्यात यावी.

(स्थळ प्रतीवर मा.जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी असे)

(डॉ.किरण महाजन)
निवासी उपजिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय पालघर

**विषय:- दि.०१.०१.२०२० रोजी कार्यरत असलेल्या तलाठी संवर्गातील कर्मचाऱ्यांची अंतिम ज्येष्ठता यादी प्रसिध्द करणेबाबत.**

**प्रपत्र-अ**

| तात्पुरत्या जेष्ठता यादीतील क्रमांक | कर्मचाऱ्याचे नाव | आक्षेप | आक्षेप मान्य/ अमान्य बाबत निर्णय |
|---|---|---|---|
| ३ | श्री.नितीन दशरथ माळगावी | माझे नाव अ.क्र.३ वर असून उपविभागाचे नांव वसई असे आहे माझी दि.१४/०६/२०१९ रोजी वसई उपविभागामधून वाडा उपविभागामध्ये बदली झाली असल्याने उपविभाग बदलून मिळण्यास विनंती आहे. | **आक्षेप मान्य - उप विभागीय अधिकारी वाडा यांच्याकडील नियुक्ती आदेशाची** छायांकित प्रत सत्यतेकामी सादर केल्याने आक्षेप मान्य करुन ज्येष्ठता यादीमधे दुरुस्ती करण्यात येत आहे. |
| ८३ | श्रीम.चैताली किशोर कुटे | **१.** ज्येष्ठता यादीमध्ये श्रीम.चैताली किशोर कुटे याऐवजी श्रीम.चैत्राली किशोर कुंटे अशी नोंद करण्यात यावी.<br>२. शासन सेवेत हजर होण्याचा दिनांक ०९.०९.२०१४ असून नियुक्ती दिनांक ०५.०९.२०१४ अशी नोंद घेण्यात यावी.<br>३. ज्येष्ठता यादीमध्ये जात प्रवर्ग खुला दर्शविण्यात आला असून त्याऐवजी भ.ज.(ड) अशी नोंद करण्यात यावी. | **आक्षेप क्र.१ व २ मान्य** सेवापुस्तकातील नोंदीची पहिल्या पानाची छायांकित प्रत सत्यतेकामी सादर केल्याने आक्षेप मान्य करुन ज्येष्ठता यादीमधे दुरुस्ती करण्यात येत आहे.<br>**आक्षेप क्र.३** ज्येष्ठता यादीतील जात प्रवर्ग हा नियुक्ती प्रवर्ग सदरचा **आक्षेप अमान्य करण्यात आला आहे.** |
| ३७ | श्रीम.रसिका राजेंद्र पाटील | ज्येष्ठता यादीतील अ.क्र.३७ वरील श्रीम.रसिका राजेंद्र पाटील यांचा नियुक्ती आदेश ०७.११.२०१२ व शासन सेवेत हजर झाल्या दिनांक १२.११.२०१२ असून ज्येष्ठता यादीवरील अ.क्र.३६ श्री.मिलींद अनंता मोकाशी यांची नियुक्ती आदेश दिनांक ०४.०३.२०१३ आणी शासन सेवेत हजर झाल्याचा दिनांक ०५.०३.२०१३ असून विभागीय दुय्यम सेवा परीक्षा व महसूल अर्हता परीक्षा सूट मिळाल्याचे संधी आणि दिनांकानूसार माझे नाव श्री.मिलींद अनंता मोकाशी यांचे अगोदर घेण्यात यावी. | **श्री.मिलींद अनंता मोकाशी व श्रीम.रसिका राजेंद्र पाटील यांचे नियुक्ती आदेश अनुक्रमे दि.०४.०३.२०१३ व दि.०७.११.२०१२ आहे.**<br>जिल्हाधिकरी ठाणे यांच्याकडील निवडसूची अवलोकन केले असता संबंधित दोन्ही कर्मचारी एकाच निवडसूचीतून नियुक्त झालेले असून त्यांना पदस्थापना आदेश वेगवेगळया दिनांकास परित करण्यात आले आहेत. महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, १९८२ मधील नियम ५ चे पोटनियम २ मध्ये नियम ४ च्या पोटनियम (२) च्या खंड (अ) मध्ये तरतुद केल्याप्रमाणे त्यांच्या आपसातील ज्येष्ठताक्रमाशी अनुरुप नसतील तेव्हा, जी व्यक्ती वरच्या क्रमावर असेल पण आपणापेक्षा कनिष्ठ असलेल्या व्यक्तींच्या नंतर कामावर रुजू झाली असेल ती तारीख तिच्या नेमणूकीची मानीव तारीख म्हणून नेमून दिली जाईल. मात्र वरच्या |